Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

Pasal SiE


# CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648

Issue X VolIV, Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139


# Current Global Reviewer


UGC Approved International Research Refereed Multidiciplanary Journal

Editor In Chief

**Mr. Arun B. Godam**

ISSUE X, Volume IV ( Half Yearly)

**Published on Sept 2018**



**Editorial Office Address :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999

Email- hitechresearch11@gmail.com



SHAURYA PUBLICATION Latur

Publisher

**Shaury Publication**

Kapil Nagar, Latur

Contact- 8149668999

**Rs. 400/-**



EXECUTIVE EDITORS

**Dr. ChittaRanjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous College , Cuttack – (Orissa)

**B.J. Hirve**
Dept. of botany
VasantMahavidyalaya, Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr. PravinDiddeshwarShete**
Dept. of Zoology, Maharashtra UdaygiriMahavidyalaya, Udgir, Dist. Latur

**MaimanatJahanAra**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**DrU.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. Hanumant Mane**
R.Guide& Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. SachinKadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm. & B.N. Sarda Sci. College,
Sangmner, Dist. Ahmadnagar (M.S.)


***www.rjournals.co.in***

# CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X VolIV , Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139

## Editoral Board Member

**Dr. N.J. Waghmare**
Research Guide & Head,
Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P. )

**Dr. Bharat Handibag**
Dean, Fculty of Arts,
Dr.B.A.M.UniversityAurangabd.(M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**B.J. Hirve**
Dept. of botany
VasantMahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. Gopal S. Bhosale**
Head, Dept. of Hindi,
Janvikas College,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Dr. B.T. Lahane**
Principal, Head, Dept. of English,
SambhajiraoKendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)

**DrU.V.Panchal**
H.O.D ,Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**S. R. Uchale**
Librarian,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Mumbai

**S.R. Kadam**
Head, Dept. of History,
Janvikas College,
Bansorala, Dist. Beed (M.S.)

**Dr. Gopal S. Bhosale**
Head, Dept. of Hindi,
Janvikas College,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Dr. Hanumant Mane**
Research Guide & Head, Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Prof. Mohan S. Kamble**
Dept. of Marathi,
JanvikasMahavidyalay,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Prof.ChitadeNandkishor**
Dept. of Economics,
JanvikasMahavidyalay,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

**Dr.KoshidgewarBhasker**
H.O.D (Computer Science)
Vai. D.M.Deglurkar College,
Degloor, Dt. Nanded (M.S)

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | धार्मीक आतंकवाद और विश्व राजनीती | विश्वनाथ हणमंतराव पवार | 79 |
| 18 | अज्ञेय की कहानियों में व्यक्त देश-विभाजन की त्रासदी | प्रा.आर.एम.खराडे | 82 |
| 19 | आधुनिक नारी की सशक्त तस्वीर - दौड | प्रा.डॉ.राजश्री भामरे | 87 |
| 20 | फणीश्वरनाथरेणु की कहानियोंमेंआँचलिकताकाचित्रण | प्रा. सूर्यवंशी एस. एम. | 91 |
| 21 | "कबीरऔरउनकीसामाजिकचेतनावर्तमान के संदर्भमें" | नैनसिंह | 96 |
| 22 | "भारतसरताज़ जम्मू–कश्मीर के पर्यटक–स्थलोंमेंपर्यटकऔरपर्यटन की संभावनाएं एवंचुनौतियां" | रविकुमार | 100 |
| 23 | 'मैं घूमरनाचूँ' उपन्यासमेंप्रताड़ितनारी | डॉ. एकतारानी | 112 |
| 24 | मीडियाकासामाजिकदायित्व | पूजा शर्मा | 114 |
| 25 | जीवन काचित्रण | स. प्रा. डॉ. राजेश प्रल्हादराव आरदवाड | 116 |
| 26 | विद्याधर पुंडलिकांच्या नाट्यवाङ्मयातील समष्टीचे दर्शन | प्रा.डॉ.सहदेव रसाळ | 126 |
| 27 | यात्रा केंद्राच्या प्रभावक्षेत्राचा भौगोलिक अभ्यास(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा) | प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर | 130 |
| 28 | सिंधूसंस्कृतीचीठळक वैशिष्ट्ये | प्रा.डॉ. बी.एस. लासुरे | 133 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol IV Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139

# विद्याधर पुंडलिकांच्या नाट्यवाङ्मयातील समष्टीचे दर्शन

**प्रा.डॉ.सहदेव रसाळ**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

---

**प्रास्ताविक :-**

विद्याधर पुंडलिकांचे एकूणच नाट्य लेखन हे समष्टीच्या वेगवेगळ्या रुपांचा वेध घेणारे आहे. मुळात पुंडलिकांचा पिंड हा कथा लेखकाचा आहे. त्यांची साहित्यक्षेत्रातील ओळख ही कथाकार अशीच आहे. या ओळखीला नाट्यलेखनाच्या माध्यमातून पुंडलिकांनी विस्तृत चेहरा दिला आहे. त्यांचे नाट्यलेखन हे प्रयोगशीलतेतून आकाराला आले. त्यांचा हा प्रयोग यशस्वी झाला, असे निश्चितपणे म्हणता येईल. आज त्यांच्या नावावर 'माता द्रौपदी', 'चार्वाक', 'दिवस फार चांगले आहेत', 'कुणीकडून कुणीकडे' आणि 'श्रध्दा' अशी पाच नाटके आहेत. त्यांच्या या नाटकातील समाजदर्शन या निमित्ताने अभ्यासले जाणार आहे. शेवटी समारोप आणि निष्कर्षांचीही मांडणी केली जाणार आहे.

**विद्याधर पुंडलिकांच्या नाट्यवाङ्मयातील समष्टी :-**

मराठी नाट्य वाङ्मयाला नवा चेहरा देणाऱ्या पुंडलिकांच्या नाट्यलेखनाची सुरूवात एकांकिकेपासून झाली. कथा वाङ्मयात मोलाची भर घातल्यानंतर पुंडलीक हे नाटकाकडे वळले. विशेषतः त्यांनी सुरूवातीला एकांकिकेचे लेखन केले. त्यांनी 'चक्र' ही एकांकिका १९६८ साली प्रकाशित केली. त्यांच्या या एकांकिकेला साहित्य वर्तुळात घवघवीत यश प्राप्त झाले. त्यानंतर त्यांचा 'चौफुला' (१९७६) हा एकांकिकांचा संग्रह प्रकाशित झाला. त्यांच्या 'चक्र' या एकांकिकेच्या प्रभावातून 'माता द्रौपदी' (१९७२) हे पाहिले नाटक पुडलिकांचे आले. त्यानंतर 'चार्वाक' (१९७९), 'दिवस फार चांगले आहेत' (१९९९), 'कुणीकडून कुणीकडे' (२०००) आणि 'श्रध्दा' (२०००) अशी एकूण पाच नाटके आली. या नाटकांनी एकूण मराठी रंगभूमीला एक वैचारिक दिशा दिली. त्यांच्या नाटकातून रेखाटला गेलेला समाज हा वेगवेगळ्या काळातील आहे. या एकूणच नाटकाला कलात्मक अधिष्ठान आहे.

'माता द्रौपदी' हे त्यांचे पहिले नाटक मराठी रंगभूमीवर आले. या नाटकातून साकार झालेला पौराणिक विषय मराठी रसिक-वाचकांचे लक्ष वेधून घेणरा ठरला. या नाटकाच्या नायकस्थानी द्रौपदी ही पौराणिक काळातील प्रसिध्द स्त्री आहे. या काळातील समाज हा वेगवेगळ्या चाकोरीतून वाटचाल करणारा होता. प्रगतीच्या शिखरावर विराजमान झालेली माणसे होती. त्याचबरोबर दारिद्र्याच्या चिखलात रुतलेली माणसेही होती. अशा या माणसांचा पट या नाटकातून उलगडत जातो. या नाटकातील पांडव आणि कौरव हे कुटुंबिय संपत्ती व ऐश्वर्याच्या उंचीवर होती. तरीही सत्तेसाठी, मान-सन्मानासाठी त्यांच्यात टोकाचा संघर्ष झालेला दिसतो. या नाटकाच्या तिन्ही अंकातून संघर्षाची वीण कायम आहे. त्यात द्रौपदी ही संघर्ष संपवण्यासाठी धडपडताना दिसते. पण तिच्या वाट्याला आलेले दुःख भयंकर आहे. याची प्रचीती या नाटकावरून येते, "द्रौपदी... माझी पाची पोरं तू कापलीस... सासर माहेरची सगळी कुळं तू मारलीस... चांडाळा! नुसती मारली नाहीस कपाट्नं, अधर्मानं मारलीस आजपर्यंत कोणीही क्षत्रियानं केलं नाही ते तू केलंस - तू झोपलेली माणसं मारलीस. भीमा, भीमा! मडकं दगडावर आपटून फोडावं तसं याचे तुकडे तुकडे कर रे!

अश्वत्थामा : मला सर्व काही मान्य आहे! मी अधर्म केला आहे, पण... कृष्णा भारतीय युध्द हे कधीच धर्मयुध्द नव्हतं. (भीम संतापाने एक लाथ मारतो.)"[१] यावरून पांडवकालीन समष्टीचे/समाजाचे दर्शन घडते. या काळातील एकूण मानवी वृत्ती-प्रवृत्ती या त्या काळातील स्थितीनुसार कशा चालत होत्या. याचा कलात्मक पातळीवर वेध 'माता द्रौपदी' हे नाटक घेते. या नाटकातील समाज नाटककारांनी मोठ्या चिंतनशीलपणे मांडला आहे. हे नाटक वैचारिक पातळीवरचे आहे. कलाकृती म्हणून रंगभूमीवर ते यशस्वी होऊ शकले नव्हते. या नाटकाच्या अनुषंगाने गो.म.कुलकर्णी विवेचन करतात, "यात सर्वात महत्वाचे कारण म्हणजे या नाटकाचे कसदारपणच या नाटकाच्या लोकप्रियतेच्या आड आले आहे."[२] हे नाट्यक्षेत्रातील वास्तव या निमित्ताने समोर येते.

पुंडलिकांनी या नाटकाच्या माध्यमातून एका वेगळ्या समाज वास्तवावर प्रकाश टाकला आहे. या नाटकाला एक सामाजिक चिंतनाची जोड आहे. महाभारत कालीन समाज कशा पध्दतीने आपले जीवन व्यथित करीत होता. याची सक्षम अशी मांडणी नाट्यकृतीतून झाली आहे. द्रौपदीच्या परिवारातील एकूणच सदस्य हे पांडवाच्या भूमिकेतील आहेत. त्यांच्याकडे असलेला शूरपणा या नाटकातून अधोरेखित होतो. या नाटकाची दुसरी बाजू असलेले कौरव कुटुंबिय यांचेकडेही लढावू वृत्ती आहे. पण काही चुकांमुळे नैतिक पातळीवर आणि युध्दभूमीवर त्यांना दारूण पराभवाचा सामाना करावा लागला. अशा एकूणच बहुविध स्तरावरून या नाटकाची वाटचाल सुरू आहे. या नाटकाचा विषय महाभारतातील पार्श्वभूमीवर असून तत्कालीन समाज व्यवस्थेचे दर्शन या नाटकातून घडते. पुंडलिकांनी प्रस्तुत नाटकातून पौराणिक विषयातून अवतरलेला समाज कलात्मक अंगाने साकार केला आहे.
'चार्वाक' हे पुंडलिकांचे आव्हानात्मक नाटक आहे. या नाटकातून एका वेगळ्या पध्दतीने विचार करणाऱ्या समाजाचे दर्शन घडते. या नाटकातील मुख्य व्यक्तिरेखा ही चार्वाकाची आहे. तो लोकायत पंथाचा प्रमुख असून हा पंथ मानवाच्या अस्तित्त्वाला महत्त्व देणारा आहे. आपल्या समाजातील प्रचलित असणारी धर्मव्यवस्था नाकारणारा आहे. धर्माच्या नावाखाली समाजाला लुटणाऱ्या प्रवृत्तीचा चार्वाक खरपूस समाचार घेतो. आपल्या समाजातील वैदिक परंपरा, जैन परंपरा आणि बौध्द परंपरा तो नाकारतो. त्यामुळे समाजातील धर्माचे सूत्रधार त्याला सर्वच पातळ्यावर बंधने आणतात. पण हा चार्वाक आपल्या विचारापासून किंचितही ढळत नाही. धर्म व्यवस्थेतील पूजा, पाठ, श्रध्दा या सर्वांना तो नकार देतो. त्या चार्वाकाला तत्कालीन समाज सुळावर देतो. यावरून असे निदर्शनास येते की, धर्माच्या विरोधात जाणाऱ्या चार्वाकाला तत्कालीन समाजाने जिवानीशी संपविले. हा चार्वाक मृत्यूच्या दारात असताना धर्माने घालून दिलेल्या रुढी, परंपरा नाकारतो. याचे वास्तवदर्शी रुप या नाटकातून येते, "चार्वाक : धर्मशास्त्रात वचन आहे- सुळी गेलेल्या पुरूषांच्या स्त्रीला पुर्नविवाह करता येतो!
आदिती : (दचकून मग हसून) जन्मभर धर्मशास्त्राला फेकून दिलंत! नेमके ह्या शेवटच्या वेळी ते आठवलं का हो?
चार्वाक : (अतिशय प्रेमाने) ये आता आदिती-
आदिती : झाली वेळ?"[३] यावरून चार्वाकासारख्या सक्षम नास्तिक वृत्तीच्या पुरूषाचा बळी तत्कालीन व्यवस्थेने धर्मव्यवस्थेच्या अस्तित्वासाठी घेतला होता. याचे वास्तव प्रत्यंतर येथे रहाते. हा चार्वाक आपल्या नास्तिक विचारतत्त्वाशी एवढा प्रामाणिक होता की, त्याने आपले घर, कुटुंब या विचारधारेसाठीच सोडलं होतं. या समाजातील दांभिक प्रवृत्तीच्या मंडळींनी कितीही छळले तरी तो आपले तत्त्व सोडायला तयार नव्हता. अशा एका वेगळ्या वास्तवाचा वेध 'चार्वाक' या नाटकाच्या माध्यमातून घेतला आहे. हे नाटक एका वेगळ्या परंपरेला आकार देणारे असून यातून पौराणिक विचारतत्त्व जन्माला आले आहे. या नाटकातील चार्वाकाची विचारधारा तत्कालीन समाज व्यवस्थेला मानवणारी नव्हती. रुढीग्रस्त संस्कारातून घडलेल्या समाजाचे एक वेगळे विचार विश्व या नाटकातून पुढे येते. 'चार्वाक' या नाटकाविषयी पुष्पा भावे विवेचन करताना म्हणतात, "चार्वाक (१९७९) या नाटकाने एका विलक्षण प्रक्षोभक विचारनाट्याचा आवाका घेण्याचा यत्न केला. पौराणिक संगीत नाटकाविषयी लिहित असताना मागे असा उल्लेख केला होता की, रंजनप्रधान वा रुपकाच्या सहाय्याने प्रबोधन करणाऱ्या पौराणिक नाटकाच्या परंपरेमुळे पुराणकथेचे प्राबल येथे (Myth) स्वरूप मराठी नाट्यपरंपरेत योजले गेले नाही. पुंडलिकांनी पुराणकथेच्या अर्थाचा हा स्तर जाणीवपूर्वक वापरलेला आहे."[४] यावरून पुंडलिकांच्या 'चार्वाक' या नाटकाचे वेगळेपण समोर येते. या नाटकाला तत्कालीन प्रवळ धर्मसत्तेचे अधिष्ठान असलेले दिसते. या धर्मसत्तेचा त्या काळातील माणसांवर आणि समाजावर कमालीचा प्रभाव होता. त्यामुळे चार्वाकासारखा तत्त्वनिष्ठ व्यक्ती नास्तिक विचार तत्त्वामुळे नाकारला जातो. हे त्याकाळातील प्रखर समाज वास्तव समोर येते. या नाटकातील तिन्ही अंकातून चार्वाकाची विचारनिष्ठा जराही ढळलेली दिसत नाही. तो आपल्या विचाराशी एकनिष्ठ असलेला दिसतो. आपला जीव गेला चालेल पण मी माझ्या तत्त्वांशी प्रतारणा करणार नाही. या भूमिकेशी ठाम असलेल्या चार्वाकाचे आणि तत्कालीन समाजाचे जळजळीत वास्तव पुंडलिकांनी या नाटकातून रेखाटले आहे.

मराठी नाटकाला वैचारिक परंपरा निर्माण करून देणारे नाटककार म्हणून पुंडलिकांकडे पाहता येईल. अशाच परंपरेतील त्यांचे तिसरे नाटक 'दिवस फार चांगले आहेत' (१९९९) हे मराठी रंगभूमीवर आले. या नाटकातील सामाजिक परंपरा ही अलिकडच्या काळातील आहे. हे तीन अंकी नाटक नक्षलवादी विचारधारेतून

क्रांती घडवू पाहणाऱ्या मानसिकतेचा वेध घेते. कामगार, लाल बावटा, भांडवलशाहीला विरोध या श्रध्देतून सतीशदादा, हिरेन, ज्योति, भूपेश या व्यक्तिरेखा या नाटकात कार्यरत असलेल्या दिसतात. कामगार, शेतमजूर, आणि शेतकरी या समाजातील घटकांचे वास्तव जीवन या नाटकातून रेखाटले आहे. या व्यक्तिरेखांच्या अंतर्गत कलहामुळे जो संघर्ष निर्माण होतो. त्या संघर्षाचे दर्शन येथे घडताना दिसते. याचे प्रत्यंतर या नाटकातील प्रसंगावरून येते, "ज्योतिः बॉस, तिथे तुमचे पिस्तूल नाही! (सतीशदा स्तंभित अक्षरशः धक्क... उभे.)

सतीशदा : कॉम्रेडड्स, Good bye! मला माझे शेवटचे शब्द बोलू द्या. माझी अखेरची विनंती...

ज्योति : क्षमा कर, बॉस, मला अखेरपर्यन्त शूर राहिलं पाहिजे. अखेपरपर्यन्त प्रामाणिक राहिलं पाहिजे. (ती पिस्तूल काढते, बाकीचेही त्याच-वेळी)

सतिशदा : तुझं प्रेम घेऊन हे होतात्म्य...

(ज्योति पिस्तूल झाडते. त्यानंतर... पाणी आहेच)"[५] हे वेगळे वास्तव पुंडलिकांच्या व नाटकाच्या माध्यमातून समोर येते. ज्या चळवळीत सतीशदाचा शब्द हा प्रमाण मानला जात होता. त्या चळवळीत हिरेनच्या मृत्यूनंतर खिंडार पडते. या प्रकारामुळे दुःखावलेली ज्योति सतीशदाच्या विरोधात फट तयार करते. त्यामुळे सतीशदा हा चळवळीमध्ये एकाकी पडतो. ज्योति पक्षात आलेल्या नवीन कार्यकर्त्यांची वेगळी स्वतंत्र अशीफळी तयार करते. अशा या वेगळ्या वास्तवावर आधारीत हे नाटक एका आगळ्या-वेगळ्या चिंतनशील प्रवृत्तीतून जन्माला आहे आहे. हे एकूणच नाटक वेगळ्या समाजविश्वाचे दर्शन घडवणारे आहे. या नाटकातील संघर्ष हा समाजातील दोन वर्गाचा असलेला दिसतो. 'आहे, रे विरुध्द नाही रे' या दोन वर्गातील संघर्षाचे दर्शन या नाटकातून घडते. या नाटकातून आर्थिक दुर्बल समाजाच्या क्रांतीचेवास्तव रेखाटण्यात आले आहे. पुंडलिकांच्या नाटकांचा वाङ्मयीन दृष्टिकोनातून विचार करत असताना ही नाटके एका उंचीवर जाऊन पोहोचली आहेत. त्याला प्रस्तुत नाटकही अपवाद ठरत नाही. या नाटकाला वेगळा कसदारपणा आहे. पुंडलिकांच्या नाटकातील गुणवत्तेविषयी विवेचन करताना गो.म.कुलकर्णी म्हणतात, "रंगभूमीचा कस वाढवण्यास कलाकारांइतकेच रसिकांचेही सहकार्य असणे अगत्याचे. एखाद्या कलाकृतीतील दोषांची चोखंदळपणे, स्पष्ट-सखोल चर्चा करणे वेगळे व तिच्यातील जटिलत्व पेलण्याचा प्रयत्नच टाळणे वेगळे. मराठी रसिकतेत शिरू पाहणारी ही दुसरी प्रवृत्ती रंगभूमीच्या विकासाला पोषक ठरणारी नाही."[६] यावरून पुंडलिकांच्या रंगभूमीवरील यशापयशाला ते स्वतः लेखक म्हणून जबाबदार असण्याचे कारणच येत नाही. त्यांनी लेखक या भूमिकेतून आपले लेखन सक्षमपणे केले आहे. त्यात रसिक-श्रोत्यांच्या अभिरुचीची दाद मिळाली नाही. यात लेखकाचा दोष नाही. या नाटकाच्या निर्मितीच्या निमित्ताने पुंडलिकांनी एक वेगळे समाजजीवन साकार केले आहे. या व्यवस्थेतील गरीब-श्रीमंत ही दरी संपवू पाहणाऱ्या चळवळीतील कार्यकर्त्यांची सक्षम फळी या नाटकातून साकार होते. त्याचबरोबर आपल्या व्यक्तीगत स्वार्थासाठी राजकारण करू पाहणारी प्रवृत्तीही रेखाटली गेली आहे. अशा वेगळ्या समाजवास्तवाचे दर्शन या नाटकातून घडते.

'श्रध्दा' (२०००) हे पुंडलिकांचे तीन अंकी नाटक राजकीय वास्तवाचा वेध घेता-घेता कुंटुंबातील श्रध्दांची होणारी पडझड मांडणारे महत्त्वाचे नाटक आहे. या नाटकाच्या माध्यमातून सामाजातील बदलत्या मानसिकतेचा वेध घेतला आहे. या नाटकातील मुख्य पात्र प्रा.माधवराव देशमुख यांच्या एकूणच कौटुंबिक वास्तवाची मांडणी येथे होते. बदलत्या समाजाच्या वर्तुणूकीमुळे माधवरावासारख्या तत्त्वनिष्ठ प्राध्यापकाची ससेहोलपट होते. आपल्या कुटुंबातील वारसा जपणाऱ्या माधवरावांना समाजाकडून तर उपेक्षित ठेवले जाते. पण कुटुंबातील सदस्यसुध्दा त्यांच्या वारसाविषययक श्रध्देची कदर करीत नाहीत. या प्रखर वास्तवाचा वेध 'श्रध्दा' हे नाटक होते. हे या नाटकातील प्रसंगावरून अधिक स्पष्ट होते, "शेखर : (शांतपणे) तेव्हा हा वाडा, मला वाटतं, आपण पाडावा आणि त्या जागी एक अलिशान 'थ्री स्टार' हॉटेल बांधावे!

माधवराव : (स्तंभित) थ्री स्टार हॉटेल?

शेखर : हो शळेला फुकट चरायला दिलेली बखळ आणि हा वाडा... दोन्ही मिळून इट् वुड बी अ फाईन...

माधवराव : अन् शळेची पोरं कुठं खेळतील? शाळा गरीब आहे... कॉर्पोरेशन परवानगी देईल?"[७] अशा प्रकारे आजच्या समाजातील हरवत चाललेल्या संस्कारशीलतेचा वेध या नाटकातून घेण्यात आला आहे. हे नाटक आधुनिक काळातील पिढी ही संस्कारापेक्षा व्यवहाराला महत्त्व देणारी आहे, याचे वास्तव रेखाटते.

'कुणीकडून कुणीकडे' (२०००) हे नाटक आजच्या बदलणाऱ्या समाजाच्या मानिसकतेचा वेध घेते. आज समाज झपाट्याने बदलत आहे. या बदलाचे प्रतिबिंब तरूण पिढीवर उमटताना दिसते. ही पिढी कमालीची बेजबाबदारपणेवागत आहे. महाविद्यालयात प्राध्यापकांना चाकूचा धाक दाखवून कॉपी करताना दिसते. याचे वास्तव प्रत्यंतर या नाटकातील प्रसंगावरून येईल, ''नाईक : सर पाया पडतो तुमच्या. निघून जा इथून. तुमचे तुकडे तुकडे होतील. माझं ऐका तुम्ही, सर- ऐका – नको हो, असे बळी जाऊ.

प्रा.देसाई : आता माझी तयारी आहे. नाईक,...(एकदम झेप घेऊन... सर्व क्षणभर अवाक)''[८]यावरून गढूळ झालेले सामाजिक वास्तव समजते. याबद्दल रागिणी वि.पुंडलीक म्हणतात, '' 'कुणीकडून कुणीकडे' हे ह्यांच नाटक तर नव्या पिढीचं प्रतिनिधित्व करणारं. कॉलेजमधील तरुण-तरुणींच्या विश्वाचं त्यांना आवडावं असं. पण... प्राध्यापकांचे खून करण्यापर्यंत घडलेले प्रसंग आपण वर्तमानपत्रात वाचतो.''[९] हे आजचे समष्टीचे वास्तव पुंडलीक आपल्या नाटकाच्या माध्यमातून मांडतात. त्यांच्या एकूणच नाटकांमधील रेखाटली गेलेली समष्टी ही वेगवेगळ्या काळातील आहे.

**समारोप आणि निष्कर्ष :-**

विद्याधर पुंडलीक हे मराठी नाट्यसृष्टीला चिंतनात्मक आयाम देणारे बिनीचे लेखक आहेत. त्यांच्या एकूणच नाटकांतून रेखाटली गेलेली समष्टी या निमित्ताने अभ्यासण्यात आली आहे. त्यांनी समाजाच्या वेगवेगळ्या रुपांची मांडणी केली आहे. त्याचे ओघवते दर्शन या निमित्ताने घडते. या नाटकांच्या अनुषंगाने चिकित्सक मांडणी करीत असताना बदलत्या काळानुरूप बदलणारे समाजविश्व अधोरेखित केले आहे. त्यानंतर ही एकूणच चिकित्सा करताना हाती आलेल्या निष्कर्षांची नोंद केली आहे.

१. विद्याधर पुंडलिकांच्या नाटकातून पौराणिक विषय सक्षमपणे मांडला गेला आहे. त्याचबरोबर त्या काळातील समाज वास्तवाही रेखाटले आहे.
२. आपल्या समाजातील धर्म व्यवस्थेला हादरे देऊ पाहणरा विचार 'चार्वाक' मधून चार्वाक या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून मांडला आहे.
३. बंदुकीच्या जोरावर क्रांती करू पाहणारी माणसे. आपल्याच माणसांचा घात करतात. हे भयानक समाज वास्तव पुंडलिकांनी त्यांच्या नाट्यवाङ्मयातून रेखाटले आहे.
४. देशातील आणीबाणीच्या काळात विचारवंत, समाजसुधारक, राजकीय नेते, प्राध्यापक आणि चळवळीतील कार्यकर्ते यांना सहन करावी लागलेली कुचंबना पुंडलिकांच्या नाटकातून साकार होते.
५. आजच्या काळातील महाविद्यालयीन वासतव पुंडलिकांनी आपल्या नाट्यकृतींच्या माध्यमातून सक्षमपणे शब्दबध्द केले आहे.

**संदर्भ सूची :-**

१. विद्याधर पुंडलीक, माता द्रौपदी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती :१९७२, पृ.क्र.५२.
२. गो.म.कुलकर्णी, माता द्रोपदी, सत्यकथा, ऑक्टोबर १९७३, पृ.क्र.१२६.
३. विद्याधर पुंडलीक, चार्वाक, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती :१९७९, पृ.क्र.८३.
४. पुष्पा भावे, प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली : १९९१, पृ.क.८०.
५. विद्याधर पुंडलीक, दिवस फार चांगले आहेत, मेहता पब्लिशिंगहाऊस, पुणे, प्रथमावृत्ती :ऑगस्ट१९९९, पृ.क्र.६१-६२.
६. गो.म.कुलकर्णी, साद-पडसाद, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती : १९७५/१८९७, पृ.क्र.१२६-१२७.
७. विद्याधर पुंडलीक, श्रध्दा, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती : २०००, पृ.क्र.६४.
८. विद्याधर पुंडलीक, कुणीकडून कुणीकडे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती :जानेवारी २०००, पृ.क्र.६२.
९. रागिणी वि.पुंडलीक, साथसंगत, मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती : १ ऑगस्ट २००८, पृ.क्र.७६-७७.